गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ३३१ वा ● रविवार २१ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 331 | Date : 21/04/2024 blow Sunday Page 4 Price 4

## धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उमेदवारी अर्जावरील हरकत फेटाळली

### प्रणिती शिंदे व सातपुतेंच्या अर्जांनाही हरकती



सोलापूर : सोलापूर राखीव आणि माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघांच्या निवडणूक प्रक्रियेतील उमेदवारी अर्जांची शनिवारी छाननी झाली. माढ्यातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी उत्पन्नाचे स्रोत न दाखविल्याचा मुद्दा उपस्थित करून त्यांच्या उमेदवारी अर्जावर एका अपक्ष उमेदवाराने हरकत घेतली होती. परंतु निवडणूक अधिका-यांनी ही हरकत फेटाळत मोहिते-पाटील यांचा उमेदवारी अर्ज मंजूर केला. माढ्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते-पाटील आणि भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यात चुरशीची झुंज अपेक्षित आहे. दरम्यान, अपक्ष उमेदवार नंदू मोरे यांनी मोहिते-पाटील यांच्या अर्जाला हरकत घेतली होती. मोहिते-पाटील यांनी दिलेल्या शपथपत्रात त्यांचे उत्पन्नाचे स्रोत नमूद केले नाही, असा हरकतीचा मुद्दा होता. त्यावर निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर यांच्यासमोर । पान २ वर

## सोलापूर व ग्रामीण भागात अवकाळी पावसामुळे नुकसान



सोलापूर : गेल्या तीन-चार दिवसांपासून सोलापूर व जिल्हा ग्रामीण भागात अवकाळी पावसाच्या हलक्या सरी कोसळत आहेत. शनिवारी दुपारी वादळी वाऱ्यांसह अवकाळी पाऊस कोसळला. उत्तर व दक्षिण सोलापूरसह अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला आदी भागात कमीजास्त प्रमाणात पावसाच्या सरी कोसळल्या. मात्र अक्कलकोटमध्ये पावसाचा जोर वाढल्यामुळे तेथील शेतांमध्ये पाणी साचले. ओढे व नाल्यांनाही पाणी आले होते. मैंदर्गी येथे वीज कोसळून दोन जनावरे दगावली.

सोलापुरात मागील तीन-चार दिवसांपासून अत्यल्प पाऊस होत असताना शनिवारी मात्र त्यात जोर होता. शहरात दुपारी ८ मिली मीटर पावसाची नोंद झाली. अक्कलकोट शहर व तालुक्यात अवकाळी पावसाने झोडपून काढले. ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला. वादळी वारेही वाहू लागले. त्यामुळे वीजपुरवठा विस्कळीत झाला. रुद्देवाडी, कडबगाव, मैंदर्गी, किणी, बोरी उमरगे, खैराट, संगोगी, तोरणी, जकापूर, उडगी, नागूर व इतर गावांमध्ये पावसाचा जोर होता. काही गावांमध्ये वादळी वा-यांमुळे घरांवरील छप्पर उडून गेले. जुन्या घरांची पडझड झाली.दक्षिण सोलापूर तालुक्यात अवकाळी पावसाने झोडपून काढताना एका गावात वीज कोसळली. या दुर्घटनेत एका आठ वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला. लावण्या माशाळे असे मृत मुलीचे नाव आहे. मुस्ती गावच्या शिवारात ही दुर्घटना घडली.

मंगळवेढा तालुक्यात कचरेवाडी, खुपसंगी, ब्रह्मपुरी, माचणूर, बठाण, आदी गावांमध्ये अवकाळी पाऊस झाला. बठाण शिवारात वादळी वाऱ्यांसह कोसळलेल्या पावसामुळे केळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. आंबा पिकाचेही नुकसान झाले. सांगोला परिसरात वादळी वाऱ्यांसह झालेल्या अवकाळी पावसामुळे काही गावांमध्ये घरांवरील छप्पर उडाले. यात एका चिमुकल्या मुलीसह दोघे जखमी झाले.

## टेस्लाची भारतातील गुंतवणूक लांबली, एलॉन मस्क यांनी दौरा पुढे ढकलला!



नवी दिल्ली : टेस्लाचे प्रमुख एलॉन मस्क हे पंतप्रधान नरेंद्र यांच्या भेटीसाठी भारत दौऱ्यावर येणार होते. भारतात ते कंपनीकडून भारतात २ ते ३ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा करण्याची अपेक्षा होती. परंतु, हा दौरा त्यांनी पुढे ढकलला आहे. ANI ने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.टेस्लातील फार मोठ्या जबाबदाऱ्यांमुळे भारत भेट लांबणीवर पडली आहे. परंतु, मी यावर्षाच्या शेवटी भारतात येण्यास उत्सुक आहे, अशी पोस्ट एलॉन मस्क यांनी केली आहे.

एलॉन मस्क २३ एप्रिल रोजी भारतात येणार होते. भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन गुंतवणुकीची योजना जाहीर करणार होते. भारत ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी वाहन बाजारपेठ असून त्यात आता टेस्लाचाही सहभा होणार आहे. यासाठी ही भेट नियोजित करण्यात आली होती. टेस्लासाठी अमेरिका आणि चीन या मोठ्या बाजारपेठा आहेत. तेथे विक्री कमी झाल्याने मनुष्यबळात १० टक्के कपात करण्याची घोषणा करण्यात आली आहे. टेस्लाने मुंबई आणि दिल्लीत नवीन दालनांसाठी जागांचा शोध सुरू केला आहे. कंपनीच्या बर्लिनमधील उत्पादन प्रकल्पात उजव्या बाजूला चालक आसन असलेल्या मोटारींचे उत्पादनही सुरू झाले आहे.। पान २ वर

## मोदींना फक्त श्रीमंतांची चिंता; राहुल गांधी यांचा आरोप



भागलपूर (बिहार), : भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि काही ठरावीक अब्जाधीश देशाच्या लोकशाहीला तसेच घटनेला धोका निर्माण करत आहेत असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. बिहारमधील भागलपूर येथील सभेत केंद्र सरकारवर टीका केली.देशातील २२ व्यक्तींकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाले असून, देशातील ७० कोटी लोकांना दिवसाला शंभर रुपयांवर गुजराण करावी लागते असा दावा राहुल यांनी केला. मोदी सरकारने २५ जणांची १६ लाख कोटींची कर्जे माफ केली असा आरोप राहुल यांनी केला. शेतकऱ्यांचे कधी कर्जे माफ केले आहे काय? असा सवाल राहुल यांनी केला. संपत्तीचे गरिबांना योग्य वाटप व्हावे यासाठी इंडिया आघाडी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान मूळ मुद्दयावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही राहुल यांनी केला. सत्तेत आल्यावर बेरोजगारीची समस्या काँग्रेस सोडवेल असे आश्र्वासन त्यांनी दिले. निवडणूक रोख्यांच्या मुद्दयांवर राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर समाजमाध्यमातून टीका केली. मोदी हे भ्रष्टाचाराची शाळा चालवत असून, भ्रष्टाचार विज्ञानाचे धडे देत आहेत असा टोला राहुल यांनी लगावला. त्यांच्याकडे धुलाई यंत्र असून, केंद्रीय संस्थांचे रूपांतर वसुली एजंटांमध्ये करण्यात आले असून, जामीन तसेच तुरुंगवासाचा खेळ यातून खेळला जातो असा आरोप त्यांनी केला.

## जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीमधील अधिकारी व कर्मचारी यांनी घेतली मतदानाची प्रतिज्ञा




सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयामधील जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीमधील अधिकारी व कर्मचारी यांना समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी ७ मे २०२४ रोजी सोलापूर व माढा मतदार संघासाठी होणाऱ्या निवडणूकीत मतदान करण्याची प्रतिज्ञा दिली.

यावेळी आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपराचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, । पान २ वर

## वीज महावितरणचा भोंगळ कारभार, अक्कलकोट शहरातील वारंवार वीज पुरवठा खंडित

अक्कलकोट/प्रतिनिधीः वीज महावितरणचा भोंगळ कारभार, अक्कलकोट शहरातील गेल्या दोन आठवड्यापासून वारंवार वीज पुरवठा खंडित. महावितरण चे अधिकारी लक्ष देतील का? भर उन्हाळ्यात अक्कलकोट शहरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली आहे.

अक्कलकोट शहरातील भीम नगर,नाईकवाड गल्ली, बेडर गल्ली,मौलाली गल्ली,माणिक पेठ,जनता चाळ,बेडर गल्ली,राजीव नगर झोपडपट्टी या परिसरातील नेहमीच वीज खंडित होत असते.काल दिनांक १८ एप्रील रोजी दुपारी च्या साडेचार वाजता लाईट बंद झालेली रात्री ११:३० वाजता आली तेही ह्या परिसरातील लोकांनी महावितरणच्या ऑफिसमध्ये जाऊन तक्रार केल्यानंतर लाईट चालू



करण्यात आली महावितरण चा फोन लाईट बंद झाल्यावर फोन उचलत नाहीत किंवा बंद ठेवतात.

तसेच दळण्याचे गिरण्या,ऑनलाइन कामे करणारे, विद्युत काम करणारे सर्वच उपकरणे कामे करताना लाईट बंद चालू मुळे हैरान होत आहेत. लाईट बिल एक दिवस जरी उशिराने भरणा केले तर विज पुरवठा खंडीत करणारे , वारंवार वीजपुरवठा गायब होत असताना काय करतात असा सवाल अक्कलकोट शहरातील तमाम नागरिकांनी महावितरण ऑफिस मध्ये रात्री ०७:०० ते ११:०० वाजेपर्यंत नागरिकांनी जाऊन महावितरण मध्ये काम करणाऱ्यांना वारंवार वीज खंडित होणाऱ्या वीजवितरणच्या भोंगळ कारभारावर जाब विचारला आणि नाराजी व्यक्त केली आहे.तरी संबंधित अधिकारी वर्गाने या परिस्थितीची वेळीच दखल घ्यावी अन्यथा अक्कलकोट शहरातील जनतेचा उद्रेक होऊन त्याचा रोष वीज वितरणला सहन करावा लागेल.

## आज सोलापुरात निघणार डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती विसर्जनाच्या अतिविशाल आणि भव्य दिव्य मिरवणुका

सोलापूर/महेश गायकवाड :सोलापूर मध्ये आज डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाची सांगता होत असून या निमीत्ताने आज शहरातील जवळपास दीडशे जयंती उत्सव मंडळाच्या विशाल आणि भव्य दिव्य मिरवणुका निघणार आहेत. सोलापूर ची डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती म्हटले की, डॉल्बी नाचगाणी आणि प्रचंड असा मोठा धिंगाणा आणि उत्साह असतो सोलापूर ची जयंती मिरवणुक ही साऱ्या जगात रेकॉर्ड ब्रेक जयंती मिरवणुक असते दर वर्षीप्रमाणे यंदाही ही मिरवणूक भव्य दिव्य आणि प्रचंड जल्लोषात निघणार आहे या जयंती महोत्सवाच्या मिरवणुकीची तयारी जयंती मंडळांनी एका महिना अगोदर पासूनच सूरू केली आहेत




दर वर्षीप्रमाणे निघणाऱ्या या विशाल आणि रेकॉर्ड ब्रेक मिरवणुकी मध्ये सर्वात आगोदर सोलापूर महानगरपालिकेचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमा असलेले वाहन असते यानंतर सोलापूर मधील नामांकित मंडळांचे विविध प्रकारचे देखावे सजावट केलेले वाहने या मिरवणुकीत सहभागी करण्यात येतात

सोलापूर मध्ये सुप्रसिद्ध असलेले आर जी कंपनी यांचे बुध्द दर्शन तरूण मंडळ, जी एम सामजिक संस्थेचे जी एम ग्रुप तरुण मंडळ, जेष्ठ रिपब्लीकन नेते प्रमोद दादा गायकवाड यांचे सिध्दार्थ तरूण मंडळ युवकांचे आयकॉन आणि प्रेरणास्थान असलेले नगरसेवक अजित भाऊ गायकवाड यांचे बॉबी ग्रुप, जेष्ठ नेते राजाभाऊ सरवदे यांचे प्रशिक सामजिक संस्था मंडळ, डी के बॉस यांचे डी के सामजिक संस्था मंडळ, आनंद चंदनशिवे यांचे पी बी ग्रुप तरुण मंडळ, यांच्या सह बुध्द राष्ट्र सामजिक संस्थेचे मंडळ तसेच आनंद बौध्द तरूण मंडळ राहूल युवक क्रीडा मंडळ यांसह सोलापूर मधील जवळपास दीडशे मंडळाच्या वतीने भव्य दिवय देखावे सादर करून मोठया ट्रेलर वर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सजावट केलेल्या प्रतिमा आणि पुतळे ठेवून या मिरवणुका काढल्या जातात, या सर्व मिरवणुका आज रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी दुपारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन मार्गस्थ केल्या जाणाऱ्या आहेतः तत्पूर्वी या मिरवणुकांचे उद्घाटन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात मान्यवरांच्या हस्ते आणि उपस्थितीत केले जाणार आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सांगता समारोप मिरवणुक पाहण्यासाठी संपुर्ण महारष्ट्र राज्यासह शेजारच्या कर्नाटक, आंध्र प्रदेश मध्य प्रदेश तसेच तमिळणाडू, तेलंगणा , गुजरात मधील आंबेडकर प्रेमी मोठ्या संख्येने वाहनांचे ताफे घेऊन सोलापुरात येत असतात. आज रविवार दिनांक २१ एप्रिल रोजी निघणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सांगता मिरवणुकीसाठी सोलापूर महानगरपालिका तसेच पोलिस आयुक्त कार्यालय विज मंडळाने आपापली तयारी पुर्ण केली असून पोलीस आयुक्त यांनी प्रचड मोठा तगडा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे तर सोलापूर मधील विविध सामजिक संस्था आणि मंडळांनी मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी थंड पिण्याच्ये पाणी अन्न दान अल्पोपहार असे उपक्रम राबविले आहेत. या सर्व मिरवणूका अतिशय प्रेक्षणीय असल्यामुळे या मिरवणुकांची नोंद वर्ल्ड ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली आहे. हत्ती घोडे उंट यांच्या सह लेझीम टिपरी झांज पथक ढोल ताशे हलगी बंजो यासह कर्न कर्कश डॉल्बी च्या निनादात वाजत गाजत निघत असतात.

सोलापूर मध्ये निघणारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची सांगता मिरवणुक ही साऱ्या जगात भारी असुन या जयंती मिरवणुकीचे जगात रेकॉर्ड झाले आहे , दर वर्षीप्रमाणे यंदाही डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक मोठ्या उत्साहात तितक्याच दिमाखात आणि शानदार पणे व भव्यआणि दिव्य प्रमाणत निघणार आहेत जयंती निवणुकित सर्वांनी शांततेने सहभागी होऊन आपापल्या जयंती मंडळाच्या मिरवणुका दिमाखात काढाव्यात **अजितभाऊ गायकवाड , संस्थापक अध्यक्ष बॉबी ग्रुप सोलापूर**

## संपादकीय

### तर त्यात वावगे काय..

राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. तसेच लोकसभा निवडणूक लढवणार नाही, अशी घोषणा करून मनसैनिकांनी आता विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागावे, असे आदेश राज यांनी दिले. राज यांच्या मनसेचा महाराष्ट्र विधानसभेत एक आमदार असला तरीही दिल्लीपासून गल्लीपर्यंत राज यांच्या रोखठोक भूमिकेची नेहमीच चर्चा असते. गेल्या काही दिवसांत राज ठाकरेंनी भाजपचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घेतलेली भेट यामुळे अनेक तर्कवितर्क लढविले जात होते. त्याचा तपशील राज जाहीर करणार याबद्दल लोकांमध्ये उत्सुकता होती. शेवटी त्या भेटीत राज यांनी काय भूमिका निश्चित केली हे अखेर स्पष्ट झाले. राज ठाकरे यांच्या निर्णयावर महाविकास आघाडी आणि महायुतीतून राजकीय प्रतिक्रिया उमटल्या; परंतु ठाकरे गटाच्या नेत्यांनी राज यांच्यावर जोरदार टीकाटिप्पणी करण्यास सुरुवात केली. राज यांची भूमिका महाराष्ट्रातील जनतेला निश्चितपणे पटणारी नाही. कोल्ह्याला द्राक्षे आंबट, असे म्हणत ठाकरे गटाच्या एका महिला नेत्याने राज यांच्यावर खोचक टीका करण्याची संधी सोडली नाही. देशाला आज सक्षम नेतृत्वाची गरज आहे. त्यामुळे फक्त मोदी यांच्यासाठी महाराष्ट्रात मनसेने महायुतीला पाठिंबा जाहीर केला आहे, असे राज यांनी जाहीरपणे सांगितले. आपल्या भावाची काळजी न घेणाऱ्या मातोश्रीतील ठाकरेंना राज यांनी स्वतंत्रपणे विचार करून जर भूमिका मांडली असेल, तर त्यावर टीका करण्याचे कारण काय?. २०१४ साली लोकसभा निवडणुकीच्या आधी मोदी हेच पंतप्रधान पदाचे लायक उमेदवार आहेत, अशी सर्वप्रथम जाहीर भूमिका राज यांनी मांडली होती. मोदी यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात गुजरातमधील विकासाचे मॉडेल त्यांनी पाहिले. राज यांना गुजरात सरकारने सरकारी पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. त्यामुळे, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी मनसेने मोदी यांना जो पाठिंबा दिला आहे, त्यातही मोदींच्या नेतृत्व गुणांचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. महाराष्ट्रात अनेक विकासकामांना गती मिळत आहे. येत्या काळात मुंबईत वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे आहे, त्याचाही विकास होईल. मेट्रोचे जाळे मुंबई नव्हे तर एमएमआरडीए क्षेत्रात दिसेल. मोदी सरकार आणि महायुती सरकार सर्वसामान्य नागरिकांना केंद्रभूत मानून कार्य करत आहे. त्यामुळे ही निवडणूक सामान्य माणसाच्या विकासाची निवडणूक आहे. देशाची कमान मोदींच्या हाती गेली पाहिजे, असे राज ठाकरे यांना वाटत असेल, तर त्यात वावगे काय?

## काँग्रेसचे हरिभाऊ सालगडी कामाला लागले !

काँग्रेस व महाविकास आघाडीतील घटक पक्ष २०२४ ची लोकसभा निवडणूक, निवडणुकी अगोदरच हारलेली दिसत आहेत. ते भाजपाच्या विरोधात लढायचे सोडून ड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीच्या विरोधात नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

ॲड. प्रकाश आंबेडकरांना व त्यांच्या पक्षाला बदनाम करणे हा एकमेव अजेंडा काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांचा दिसत आहे. त्यासाठी काँग्रेस व मविआ कांही पुरोगामी व आंबेडकरवादाची झुल पांघरलेल्या बेगडी, ढोंगी विकले गेलेले पाकीटछाप पत्रकार, तथाकथित लेखक, विचारवंत , प्राध्यापक, डॉक्टर, वकील यांचा खुबीने वापर करून वृत्तपत्रातून, समाज माध्यामातून, इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्याद्वारे वंचित बहुजन आघाडी व ॲड.. प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात दररोज अपप्रचार करीत आहेत. दररोज एक (सो कॉल्ड)तथाकथित विचारवंत माध्यामासमोर येतो व ॲड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीच्या विरोधात एकांगी गरळ ओकतो. हे असे का चालू झाले आहे हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. आज भाजपा व आर एस एस च्या विरोधात ड. प्रकाश आंबेडकर हे ऐकमेव नेते कसलीही साधनसामग्री नसताना जनमताच्या जोरावर लढत आहेत. त्यांना वंचित समूहाकडून मिळणारा प्रतिसाद पाहून जातीयवादी, भांडवलदारी, सरंजामदारी मानसिकता असलेले, संविधानाबद्दल बेगडी प्रेम असलेली काँग्रेस व मविआ हादरून गेले आहेत.



ॲड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार लोकसभेत निवडून गेले तर आपलं काही खरं नाही, आपला बाजार उठेल ही भिती त्यांच्या मनांत आहे. म्हणून त्यांनी मविआ मध्ये वंचित बहुजन आघाडीला समाविष्ट करून घेतलेले नाही हे वंचित घटकांनी, फुले-शाहु-आंबेडकरवादी संविधान प्रेमींनी लक्षात घेतले पाहिजे.

भाजपा, आर एस एस चा धोका, संविधान नष्ट करण्याचा बागुलबुवा दाखऊन त्यांना फक्त वंचितांची मते पाहीजेत! पण वंचित घटकांना सत्तेत वाटा द्यायचा नाही. सरंजामदारांचे, भांडवलदारांचे, घराणेशाहीचे हित जपणे हा काँग्रेस व मविआचा व भाजपाचा एकच अजेंडा आहे. हे ओळखूनच ॲड. प्रकाश आंबेडकरांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. वंचित बहुजन आघाडीला महाराष्ट्रामध्ये प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. हे बघून महाराष्ट्रातील प्रस्थापित राजकीय पक्षांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. म्हणून त्यांनी आपले सालगडी कामाला लावले आहेत!मी तर त्यांना गधे पत्रकार म्हणेन! यामध्ये पाकीटछाप निखिल वागळे, मॅक्स महाराष्ट्र सारखी चॅनल्स व इतर मालक सांगेल तसं फुटकळ लिहिणारे टीनपाट गधे पत्रकार! यांत बरीच नावे आहेत, मी त्यांची नावे घेऊन उगीचच त्यांना महत्व देऊ इच्छित नाही. तेवढी त्यांची लायकी नाही.

वंचित व ड. प्रकाश आंबेडकरांची बदनामी करण्यासाठी दुसरी टीम म्हणजे स्वतःला पुरोगामी, डावे,समाजवादाची, आंबेडकरवादाची खोटी झुल पांघरलेले ढोंगी पत्रकार, लेखक, विचारजंत, वकील, डॉक्टर, प्राध्यापक मंडळी टीनपाट राजकीय कार्यकर्ते! यामध्ये त्या वाघमारे का आंधारे बाई! असिम सरोदे, विश्र्वंभर चौधरी, डॉ. संग्राम पाटील, तसेच स्वतःला उपरा समजणारा पण खाऊन खाऊन पोट फुटेल अशी अवस्था झालेला! अबला महिलांवर बलात्कार केले असा आरोप असलेला शरद पवारांचा पाळीव कुत्रा! तो माने का फाने! स्वतःच्या आकाला वाचविण्यासाठी सरसावलेला पाकीटछाप शाम मानव ! ढोंगी समाजवादी कुमार सप्तर्षी! एवढे करूनही ड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडी बदनाम होत नाही! उलट महाराष्ट्रभर त्यांचा वारू जनमताच्या जोरावर चौफेर उधळू लागल्याचे चित्र दिसल्यावर लबाड काँग्रेसने गांधीजींचे नातू तुषार गांधींना आंबेडकरांच्या नातवाच्या विरोधात गरळ ओकण्यासाठी मैदानात उतरवले! पण गांधीजींची ब्रिटीशविरोधी चळवळ सर्वसमावेशक होती व त्यांच्या विचारात स्पष्टता होती, तशी आजोंबा सारखी विचारांची स्पष्टता राजकारणामध्ये तुषार गांधी तुमच्याकडे नाही असे दाखऊन ड. प्रकाश आंबेडकरांनी तुषार गांधींचा चांगलाच समाचार घेतला!

तरीही ॲड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडी हा पक्ष बदनाम होत नाही हे दिसल्यावर काँग्रेसने डॉ. भालचंद्र मुनगेकर व डॉ. रावसाहेब कसबे या हरिभाऊ सालगड्यांना ॲड. प्रकाश आंबेडकरांच्या विरोधात गरळ ओकायला भाग पाडले! या दोन हरिभाऊ सालगड्यांनी काँग्रेसने लिहून दिलेली स्क्रीप्ट जशीच्या तशी माध्यामांसमोर वाचली व आपलं काम इमाने इतबारे केले! या दोघांनाही जेष्ठ अर्थतज्ञ व जेष्ठ विचारवंत म्हणून भारतभर मान्यता होती व आजही आहे. पण आजची त्यांची भुमिका पाहुन वाटते की हे विचारवंत आहेत की विचारजंत!

पण आता एवढं नक्की झालेय की हे दोघेही ढोंगी आंबेडकरवादी आहेत. पुरोगामीपणाची व आंबेडकरवादाची खोटी झुल पांघरून स्वतःची पोळी भाजून घेण्यासाठी दलित, आदिवासी, ओ बी सी, वंचित घटकांना न्याय मिळऊन देण्याची भुमिका घेण्याऐवजी सरंजामदारांना, भांडवलदारांना, घराणेशाहीला पाठींबा देऊन आपण सरंजामदारांचे कसे सालगडी आहोत हे सिध्द केले आहे. हे काँग्रेसचे दोन्ही हरिभाऊ सालगडी खोटी आकडेवारी देऊन खोटी मांडणी करीत आहेत !काँग्रेस या राष्ट्रीय पक्षाला देशभरात आता पहिल्यासारखा जनाधार राहिलेला नाही हे वास्तव हे सालगडी मानायला तयार नाहीत. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांपैकी एक खासदार फक्त १३०० मताधिक्य घेऊन राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसचा येतो तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये उभी पडून त्यांचे बरेचसे आमदार, खासदार भाजपाच्या महायुतीत सामील झालेले आहेत. तर उरलेले उध्दव ठाकरे व शरद पवार सहीत कधी भाजपमय होतील हे काँग्रेसचे सालगडी मुनगेकर व कसबे छातीठोकपणे सांगू शकणार नाहीत!

ॲड. प्रकाश आंबेडकरांचा गेल्या ४३ वर्षांचा सामाजिक, राजकीय प्रवास प्रखर आर एस एस विरोधी व भाजपविरोधी व प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात राहीलेला आहे हे मुनगेकर व कसबे या विचारजंतांना माहीत असुनही आज ते काँग्रेसने लिहून दिलेली ड. प्रकाश आंबेडकर विरोधी स्क्रीप्ट वाचत आहेत.

काँग्रेसचे सालगडी मुनगेकर व कसबे यांनी आजपर्यंत अनेक उपकारांची पदे भोगलेली आहेत व येथून पुढे उपकारांची पदे भोगण्यासाठी त्यांची धडपड चालू आहे, हे त्यांच्या पोपटपंची वरून दिसते !

डॉ. रावसाहेब कसबे खरे तर आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक होते ! त्यांचा चळवळीतील कार्यकर्त्यांबरोबर दांडगा संपर्क होता. पण आजची त्यांची भुमिका पाहून आश्र्चर्य वाटते. ते लाचार रामदास आठवलेंचं गुणगान गाऊन उदोउदो करतात ! तर १९८४ सालापासून स्वाभीमानाचे राजकारण करून स्वाभीमानी आंबेडकरी चळवळ व स्वाभीमानी कार्यकर्ते निर्माण करणाऱ्या ड. प्रकाश आंबेडकरांना दुसणे देऊन महाराष्ट्रात आंबेडकरी पक्ष शिल्लक राहीला नाही असे खोटे विधान करून समाजद्रोह करतात. आज दोघेही काँग्रेसचे सालगडी संविधान वाचविण्याची भाषा करीत आहेत. पण हे संविधान ज्या आर एस एस व भाजपामुळे धोक्यात आले आहे तो भाजपा पक्षाची वाढ होण्यासाठी काँग्रेसची ध्येयधोरणेच कारणीभूत आहेत हे दोघेजन लक्षात का घेत नाहीत ? असा माझा सवाल आहे. शिवसेनेमुळे भाजपा पक्ष महाराष्ट्रामध्ये वाढला ,फोफावला तो शिवसेना पक्ष अचानक संविधान वाचविणारा पक्ष कसा काय वाटू लागला? हे डॉ. रावसाहेब कसबे व डॉ. भालचंद्र मुनगेकरांनी एकदा जाहीर करावे. ड. प्रकाश आंबेडकर हे ऐकमेव नेते आहेत जे गेली ४३ वर्षे प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात शड्डू ठोकून उभे आहेत आणि दलित, शोषित, आदिवासी, मायक्रो ओ बी सी, अल्पसंख्याक, गरीब मराठा, वंचित समुहाला संघटित करून त्यांच्या प्रश्र्नांवर लढत आहेत . या सर्व वंचित घटकांना सत्तेत वाटा मिळावा म्हणून जीवाचे रान करीत आहेत.हे या देशातला फुले, शाहु, आंबेडकरवादी तरूण जवळून पहात आहे. त्यामुळे काँग्रेस व त्यांच्या चेल्याचपेट्यांनी, सालगड्यांनी ड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीच्या विरोधात कीतीही नेरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला तरी आता काँग्रेसला व त्यांच्या सालगड्यांना यश येणार नाही. काँग्रेस व भाजपा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे या देशातील जनतेच्या लक्षात आले आहे.

**-विलास रंजना टेकाळे,**
**मो.९८८१०४१७७६.**

पान १ वरुन

## धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या

सुनावणी झाली. परंतु सुनावणीअंती ही हरकत फेटाळण्यात आली.सोलापूर राखीव मतदारसंघात ४१ तर माढा मतदारसंघात एकूण ४२ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. या अर्जांच्या छाननीच्यावेळी सोलापूरच्या काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या अर्जाला अपक्ष उमेदवार सचिन म्हस्के यांनी हरकत घेतली. प्रणिती शिंदे यांच्या उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात गुन्ह्यांचे कलम नमूद केले नाही. तर दुसरे अपक्ष उमेदवार अतिश बनसोडे यांनी, प्रणिती शिंदे यांच्या अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती असल्याची हरकत घेतली आहे. त्यांच्या जातीच्या दाखल्याबाबतही हरकत घेण्यात आली आहे.

भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्या उमेदवारी अर्जावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते तथा अपक्ष उमेदवार प्रमोद गायकवाड यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. सातपुते यांच्या जातीचा दाखला बनावट असल्याचा आक्षेप घेतला आहे. दुसरे अपक्ष उमेदवार भारत कंदकुरे यांनी जातीच्या दाखल्यावर राम सातपुते यांच्या अर्जाला हरकत घेतली आहे. सातपुते यांचे जात वैधता प्रमाणपत्र २०१२ सालचे आहे. त्यांचे अभियांत्रिकी शिक्षण २०१५ मध्ये झाले होते. त्यांनी २०१३ साली वाहने खरेदी केली. ऊसतोड मजुराचा मुलगा असल्याचा दावा करणारे सातपुते यांच्याकडे एवढी वाहने कशी ? तसेच त्यांच्या पत्नी संस्कृती यांच्या नावाने संपत्ती नमूद करताना त्यांच्या नावाने पन कार्ड नाही. तर मग त्यांच्या नावाने संपत्ती कशी आली, असा सवाल हरकतीद्वारे उपस्थित करण्यात आला आहे. या सर्व हरकतींवर जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली.

दरम्यान, माढ्यात आपल्या उमेदवारी अर्जावरील हरकत फेटाळली गेल्यानंतर धैर्यशील मोहिते-पाटील यांनी विरोधकांना टोला लगावला. प्रत्यक्ष निवडणुकीच्या आधीच विरोधक रडीचा डाव खेळत आहेत, दोन हात होऊन जाऊ द्या, आपण तर तयार आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

## टेस्लाची भारतातील गुंतवणूक

तिथून भारतात मोटारी निर्यात केल्या जातील.

परंतु, टेस्लाच्या पहिल्या तिमाहीतील कामगिरीबाबत चर्चा करण्याकरता अमेरिकेतील महत्त्वाच्या बैठकीसाठी एलॉन मस्क यांना २३ एप्रिल रोजी जावं लागणार आहे. त्यामुळे हा पूर्वनियोजित दौरा रद्द करण्यात आल्याचे वृत्त इंडिया टुडेने दिले आहे. मस्क यांनी गेली अनेक वर्षे भारतात आकारण्यात येणाऱ्या जास्त आयात शुल्काला विरोध केला होता. यात बदल व्हावा, अशी आग्रही भूमिकाही त्यांनी घेतली होती. केंद्र सरकारने मार्च महिन्यात नवीन ई-व्ही धोरणात आयात शुल्क १०० टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर आणले आहे. देशात ५० कोटी डॉलरची गुंतवणूक करून उत्पादन प्रकल्प सुरू करणाऱ्या मोटार निर्मिती कंपन्यांसाठी हे धोरण आहे. त्यामुळे टेस्लाकडून ही गुंतवणूक केली जाणार आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

## जिल्हास्तरीय माध्यम

वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू अशी प्रतिज्ञा घेण्यात आली.तसेच लोकसभा निवडणूकीमध्ये सर्वांनी मतदान करुन लोकशाहीच्या उत्सवामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे याबाबत जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी समिती सदस्य तथा क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकूश चव्हाण यांच्यासह माध्यम व प्रमाणीकरण समितीमधील अंबादास यादव , रफिक शेख, गणेश बिराजदार , डॉ.श्रीराम राऊत ,सचिन सोनवणे ,समीर मुलाणी , धुळाप्पा जोकार ,सुभाष भोपळे ,शरद नलावडे ,मिलिंद भिंगारे ,ईलीहास ईनामदार ,संजय घोडके , दिलीप कोकाटे ,राजेंद्र तारवाले, आर.एच.शेख, एल.आर. बोमेन, बसवराज माळी ,भास्कर मदनाला ,भाऊसाहेब चोरमले , ईकबाल भाईजान नागेश दंतकाळे, प्रविण चव्हाण, एम.एस.साठे , एस.एन.शेंडगे ,अमोल घाडगे, प्रिया शहाबादे , पुजा बाबर , अमोल कोळी आदी उपस्थित होते.

## सावधान..भारतीय लोकशाहीत पेड न्यूजला थारा नाही!

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्या पार्श्र्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने दि.१६ मार्च २०२४ आदर्श आचार संहिता जाहीर केली आहे. लोकसभेत योग्य, कार्यक्षम व लोकाभिमुख दृष्टिकोन असलेला लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी प्रत्येक भारतीय मतदाराने मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येते. मतदान करणे, हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याने मतदारांनी कुठल्याही आमिषाला वा प्रलोभनाला बळी पडू नये. तसेच धाकदपटशाहीला भीक न घालता मतदारांनी सद्सद्विवेकबुद्धीने मतदान करावे. महत्वाचे म्हणजे निवडणुका मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पडाव्यात, यासाठी सर्वपक्षीय उमेदवारांनी अन् प्रसारमाध्यमांनी सहकार्य करावे, असे निवडणूक आयोगाकडून आवाहन करण्यात आले आहे.

मागील काही सार्वत्रिक निवडणुकींचे सिंहावलोकन केल्यावर देशात काही ठिकाणी पेड न्यूज च्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. खरे तर, अशा घटना लोकशाहीला मारक आहेत. त्याचप्रमाणे पेड न्यूज हे मुक्त व शोधपत्रकारितेलाही बाधक आहे. यास्तव वृत्तपत्रे अन् त्यांच्या प्रतिनिधींनी पेड न्यूज ला अजिबात थारा देऊ नये. सर्वात महत्वाचे म्हणजे सुदृढ लोकशाहीसाठी उमेदवारांनीदेखील आपल्या प्रचार मोहिमेदरम्यान पेड न्यूजचा आधार घेवू नये. कारण पेड न्यूज हा लोकशाही संवर्धनाच्या मार्गातील मोठा अडसर आहे, हे लक्षात घ्यावे.प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पेड न्यूजसंदर्भात केलेली व्याख्या एखाद्या उमेदवाराने पैशाच्या मोबदल्यात किंवा विशेष मेहरनजरेच्या बदल्यात प्रसिद्धी माध्यमाद्वारे केलेली बातमी, वृत्तांकन, विश्र्लेषण वा प्रसारण अशी आहे. असे कृत्य केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्या संबंधीत प्रसारमाध्यम, वृत्तपत्र आणि उमेदवाराच्या लोकप्रियतेला तडा जावून जनमानसातील विश्र्वासाहर्ता नाहीशी होत असते. म्हणजेच एखाद्या उमेदवाराने, राजकीय पक्षाने वा त्याच्या संघटना किंवा संस्थेने मतदारांना प्रभावित करण्याच्या हेतूने वर्तमानपत्रे, सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया ( विभिन्न चॅनल्स) यांच्याद्वारे सोयीनुसार बातम्या प्रसिद्ध-प्रसारित करणे, हे सर्व प्रकारे पेड न्यूजच्या कक्षेत येतात, हे उमेदवार व माध्यमांनी जरूर लक्षात घ्यावे.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे वृत्तांकनाच्या (दृकश्राव्य) बदल्यात घेतलेला पैसा वा भेटवस्तू याला भ्रष्टाचाराचे कृत्य म्हणून घोषित केल्याने, तो आता शिक्षापात्र अपराध आहे. म्हणूनच पेड न्यूजसारख्या गैरप्रकारांना प्रसारमाध्यमांनी स्वतःहूनच मज्जाव करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

उमेदवारांनी प्रचार मोहिमेत केलेल्या खर्चाचा अचूक लेखा ठेवून, त्याचे विवरणपत्र संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे तसेच खर्च नियंत्रण समितीच्या नोडल अधिकाऱ्यांकडे सादर करणे, निवडणूक आयोगाने अनिवार्य केले आहे. त्यात कसूर करणे हाही एक अपराधच आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे तर पेड न्यूज हा निकोप पत्रकारितेची संभाव्य कीड आहे. यासाठी पत्रकारांनीच पुढाकार घेवून पेड न्यूज या अनैतिक बाबीला अस्वीकृत करून हद्दपार करायला हवे. वृत्तपत्रे व दूरचित्रवाहिन्यांनी पत्रकारितेची मूल्ये शिरसावंद्य मानून, लोकशाहीची बूज राखायला हवी. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी हे लोकशाहीचे पाईक असल्याने, त्यांनी पत्रकारिता क्षेत्रातून पेडन्यूजला हद्दपार करण्यास कटिबद्ध व्हावे. घटनाकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटना अन् भारतीय लोकशाहीचा जगाच्या पाठीवर सर्वत्र नावलौकिक आहे. या पार्श्र्वभूमीवर लोकसभेतील सर्वपक्षीय उमेदवार, त्यांचे पदाधिकारी आणि प्रसारमाध्यमे (प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमे) या सर्वांनी योग्य ती खबरदारी घेऊन लोकशाहीला मारक असलेल्या पेड न्यूजचा मार्ग अवलंबू नये, असे कळकळीचे आवाहन करण्यात येत आहे. आपण अशा प्रकारे कर्तव्यपूर्ती केल्यामुळे भारतीय लोकशाही जागतिक स्तरावर सदैव आदर्श लोकशाही म्हणून गणली जाईल, हे निश्र्चित!

**-मनोज सुमन शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे
तथा नोडल अधिकारी, एकत्रित मीडिया कक्ष आणिसदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, ठाणे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## बारामती लोकसभा मतदारसंघात मनसेचे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न: दिलीप धोत्रे



पंढरपूर/प्रतिनिधीः बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सौ सुनेत्रा ताई अजित पवार यांच्या प्रचारार्थ बारामती लोकसभा मतदारसंघातील बारामती दौंड इंदापूर पुरंदर भोर

वेल्हा खडकवासला या विधानसभा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बारामती शहरातील हॉटेल सिटी इन येथे घेण्यात आली यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेना चे नेते आणि बारामती लोकसभा मतदारसंघाचे समन्वयक दिलीप बापू धोत्रे राज्य उपाध्यक्ष आणि समन्वयक सुधीर पाटसकर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा गारडकर मनसेचे जिल्हाध्यक्ष सूर्यवंशी जिल्हाध्यक्ष शिरवाडकर जिल्हा संघटक विनोद जावळे कैलास दांगड तसेच सर्व उपजिल्हाध्यक्ष तालुका अध्यक्ष शहराध्यक्ष उपाध तालुका उपाध्यक्ष शहरातील विभाग प्रमुख इत्यादी उपस्थित होते

## आमदार सुभाष बापू देशमुख भंडारकवठे येथील जाहीर सभेत राम सातपुते यांना मताधिक्य देण्याचा निर्धार

पंढरपूर/प्रतिनिधीः काँग्रेसने त्यांच्या कार्यकाळात जनतेची पोचवणूक केली कायम जातीपातीचे राजकारण केली त्यामुळे २०१४ मध्ये जनतेने त्यांना सत्तेच्या बाहेर भेटली यानंतर आलेल्या मोदी सरकारची अनेक विकास कामे केली लोकांना विश्र्वासात घेऊन विविध योजना राबवल्या व काळातील लोकांना या योजनेचा लाभ दिला विकास आणि समृद्धीसाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसवण्यासाठी सोलापूरतून माहिती उमेदवार राम सातपुते ना प्रचंड बहुमताने निवडून आणावे असे आव्हान आमदार सुभाष देशमुख यांनी भंडारा कवठे येथील सभेत केली महायुतीचे उमेदवार राम सातपुते आणि आमदार सुभाष




देशमुख यांनी शुक्रवारी दक्षिण तालुक्यातील ग्रामीण भागात दौरा केला यावेळी त्यांनी विविध गावांना भेटी देत मोदी सरकारच्या योजना लोकांसमोर मांडल्या तसेच पुढील भविष्यासाठी भाजपला निवडून आणायचे आवाहन केले यावेळी आमदार राम सातपुते यांनी टाकळी ओळखवता कोरगोटा सत्संग कुंडल माळकवटे कारकाल या गावांना भेटी दिल्यावर त्यानंतर सायंकाळी भंडारकवठा येथे यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण मतदार संघातून राम सातपुते यांना जास्तीत जास्त मध्ये मताधिक्य देण्याचा निर्धार व्यक्त केला यावेळी राम सातपुते मनालाही देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक विकास कामे केली आहे राज्यातील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी प्रत्येक मतदारसंघात भरपूर विकास निधी दिला आहे दक्षिण तालुक्यातील जास्तीत जास्त निधी खेचून आणण्याचा आमदार सभा देशमुख यशस्वी झालेल्या पुढील काळात सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विकास कामाकरिता आपण कटिबद्ध आहोत

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष संगपाल किर्के सरपंच भीमाशंकर बबलेश्र्वर डॉक्टर जनाप्पा गोंडा हवी नाळे संदीप टेळे आप्पासाहेब पाटील आंबेगाव पाटील जगन्नाथ गायकवाड हनुमंत कुलकर्णी हनुमंत पुजारी येथील शहा सोमलिंग कमळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## राष्ट्रीय हितासाठी व सर्व धर्माच्या संरक्षणासाठी मोहिते पाटील यांचा प्रचार करणार: रजनीताई पाटील

करमाळा/प्रतिनिधीः देशामध्ये होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने माढा लोकसभा मतदारसंघाच्या दृष्टीने करमाळा तालुक्याच्या काँग्रेस आणि महिला आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक करमाळा तालुका काँग्रेस आहे महिला आघाडीच्या अध्यक्षा रजनीताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शहराध्यक्ष अरुंधती जगताप यांच्या प्रमुख उपस्थित करमाळा येथे संपन्न झाली या बैठकीमध्ये काँग्रेस आहे महिला आघाडी करमाळा तालुका अध्यक्ष रजनी ताई पाटील म्हणाले की आमची आमची मार्गदर्शक करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी दादा जगताप व काँग्रेस कमिटी करमाळा तालुका अध्यक्ष प्रतापराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय हितासाठी तसेच सर्व धर्माच्या संरक्षणासाठी जातीवादी सत्ता उलटून टाकून देशात पुन्हा एकदा सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या इंडिया गाडीचे सत्ता येणे गरजेचे आहे त्यासाठीच माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारासाठी अचूक नियोजन करून



महिला काँग्रेसचे अध्यक्ष शनीताई शेख व शीतलदेवी धैरशील मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करमाळा तालुक्यातील असणाऱ्या सर्व पंचायत समिती गणांमध्ये व करमाळा शहरात हळदीकुंकवाचे कार्यक्रम आयुत करून प्रत्येक गावांमध्ये पदयात्रा काढून धैर्यशील भैया मोहिते पाटील यांच्या जोमाने प्रचार करणार असल्याची सांगितले गेल्या दहा वर्षांमध्ये देशांमध्ये महागाईने अहंकार माजवला असून हा महागाईचा प्रत्येक महिलेला सामना करावा लागतो भाजपच्या चुकीच्या धोरणाचा फटका सर्वसामान्य जनतेला नाहक सहन करावा लागतोय त्यामुळे प्रत्येक पंचायत समिती करमाळा शहरातील प्रत्येक प्रभागात मध्ये जाऊन आपल्या सर्वांची हमी माढ्यातून एक कमळ कमी हे ब्रीदवाक्य डोळ्यासमोर ठेवून महागळे सागर माढा लोकसभा उमेदवार म्हणून धनश्री भैया मोहिते पाटील यांचा प्रचार आणि प्रसार करणारा असल्याची रजनीताई पाटील यांनी सांगितले सदर या बैठकी करिता करमाळा ग्रामीण व शहरातील सर्व महिला आघाडी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कोकणची माणसं साधी भोळी, भरुन देतील महायुतीच्या मतांची झोळी : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले




मुंबई/प्रतिनिधीः उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांना युतीसोबत येण्यास सांगितले,मात्र त्यांनी ऐकले नाही आणि त्यांच्या पक्षात फुट पडली असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. ईशान्य मुंबई चे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा यांच्या प्रचारासाठी भांडुपमध्ये आयोजित केलेल्या जाहीर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.सभेत बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो नसल्याने नाराज झालेल्या शिवसैनिकांबाबत बोलताना केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी नाराजी योग्य असल्याचे म्हटले तसेच महाराष्ट्रात पहिली युती झाली ती अटलबिहारी वाजपेयी आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या संगमतानेच पूर्वी शिवसेनेचा आमचा ३६ आकडा होता,पण आता सध्या ६३ चा आहे.पण बाळासाहेब ठाकरे यांनी सोबत येण्यास सांगितले.बाळासाहेब ठाकरे यांच्या सांगण्यावरून भीमशक्ती शिवशक्ती एकत्र येण्याचा निर्णय घेतला होता,अशी आठवण त्यांनी सांगीतली.

भांडुप मध्ये कोकणी माणूस मोठ्या संख्येने वास्तव्यास आहे,असे सांगतांना ना.रामदास आठवले यांनी कोकणची माणस साधी भोळी,भरुन टाकतील मिहीर कोटेचा यांची मतांची झोळी अशी कविता सादर करताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करुन ना.आठवले ना दिलखुलास दाद दिली.आपल्या भाषणात आठवलेंनी अनेक चारोळी कविता आपल्या खास शैलीत सादर करुन भांडुपवासियांना खुश करुन सभा जिंकली.

## संविधान व लोकशाही वाचविण्यासाठी एमआयएम सोलापूर लोकसभा लढवणार नाही ; फारूक शाब्दी

अक्कलकोट/प्रतिनिधीःसंविधान व लोकशाही वाचविण्यासाठी एमआयएम सोलापूर लोकसभा लढवणार नाही असे एमआयएमचे शहर आणि जिल्हा प्रमुख फारूक शाब्दी यांनी निर्णय घेतला.



गेल्या आठवडाभरापूर्वी एमआयएमचे शहर आणि जिल्हा प्रमुख फारूक शाब्दी यांनी सोलापूर लोकसभेसाठी एमआयएम कडून उमेदवार देणार असे जाहीर केले होते त्यानंतर मुस्लिम समाजातून व एमआयएम पक्षातून नाराजी व्यक्त झाल्याचे दिसून आली. त्यानंतर दोन दिवसापूर्वी फारूक शाब्दी यांनी संविधान व लोकशाही वाचविण्यासाठी एमआयएम सोलापूर लोकसभा लढवणार नाही असे एमआयएमचे शहर आणि जिल्हा प्रमुख फारूक शाब्दी यांनी निर्णय घेतला. फारूक शाब्दी यांच्या निर्णयाचा स्वागत सोलापूर शहरातील व अक्कलकोट, अक्कलकोट तालुक्यातील संविधान मांनणाऱ्या आणि मुस्लिम बांधवांनी या निर्णयाचा स्वागत केला. एकंदरीत फारूक शाब्दि यांनी घेतलेल्या निर्णयाचा फायदा काँग्रेसच्या मा.प्रणिती शिंदे यांना होणार. कारण हेच फारुक शाब्दी आमदारकीला मा.प्रणिती शिंदे कडून थोड्याच मताने फारुक शाब्दी पराभव झाला होता.आमदारकीला फारूक शाब्दि यांनी दोन नंबरचा स्थान ही घेतला होता फारूक शादी यांचा सोलापूर मध्ये मोठा चाहता वर्ग व मुस्लिम समाजाचा एकगठ्ठा मतदान फारूक शाब्दी यांना मिळाला होता.

मागील लोकसभा निवडणुकीत एमआयएम आणि वंचितने युती करत जबरदस्त फाईट दिली होती. प्रकाश आंबेडकर यांनी जवळपास १ लाख ७० हजार मत प्राप्त करत, निवडणूकीचा निकाल बदलून टाकला होता. दलित आणि मुस्लिम मतांचा विभाजन झाल्याने काँग्रेसचे उमेदवार सुशीलकुमार शिंदेंचा पराभव झाला होता. भाजपचे डॉ जयसिद्धेश्र्वर महाराज महास्वामी यांचा १ लाख ५८ हजार मतांनी विजय झाला होता.

यावेळेस मात्र फारूक शाब्दी यांनी घेतलेले निर्णय एकदम अचूक ठरणार कारण मुस्लिम समाजाची व संविधानला मानणाऱ्यांची मते विभाजन होऊ नये म्हणून फारूक शादी यांनी निर्णय घेतला असावा अशी चर्चा सध्या सर्वत्र होत आहे.

## अग्निशमन सेवा सप्ताहाची सांगता

मुंबई : अग्निशमन सेवा सप्ताहाचा सांगता समारोह मुंबई विद्यापीठाच्या कालिना येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन समोरील मैदानावर २० एप्रिल रोजी पार पडला.

१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई गोदीत एस. एस. फोर्ट स्टिकिन् या जहाजाला आग लागून झालेल्या भीषण स्फोटात अग्निशमन व विमोचनाचे कार्य करीत असताना मुंबई अग्निशमन दलाच्या ६६ जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सुचनेनुसार जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रत्येक वर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो. या सप्ताहाचे उद्घाटन राज्यपाल यांच्या शुभहस्ते राजभवन येथे १४ एप्रिल रोजी झाले. या सप्ताहाच्या सांगता समारोहासाठी प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय गृह मंत्रालय अग्निशमन सेवा-सिव्हील डिफेन्स व होम गार्डचे महासंचालक विवेक श्रीवास्तव, आयपीएस यांनी उपस्थित राहून संचलनाची मानवंदना स्विकारली. याप्रसंगी उल्हासनगर महानगरपालिकेचे आयुक्त अजीज शेख हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.राज्याचे अग्निशमन सेवा संचालक आणि महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळाचे प्रमुख अग्निशमन अधिकारी संतोष वारीक यांनी अग्निशमन सेवा सप्ताहाबाबत प्रस्तावना केली.




राज्यातील विविध महानगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट, भाभा अॅटोमिक रिचर्स सेंटर, इत्यादींच्या अग्निशमन सेवांचे प्रमुख अग्निशमन अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. या सप्ताहामध्ये अग्निशमनाबाबत विविध प्रसार माध्यमांद्वारे जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात आले. या सप्ताहाचा एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. तसेच औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी तसेच नियमीत अग्निशमन दलातील जवानांसाठी विविध फायर ड्रिल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच स्वातंत्र्यदिन-२०२३ आणि प्रजासत्ताक दिन-२०२४ या प्रसंगी ज्या अग्निशमन अधिकारी व जवानांना राष्ट्रपतींची अग्निशमन सेवा पदके जाहिर झाली त्यांना प्रमुख अतिर्थींच्या शुभहस्ते सन्मान चिन्हे प्रदान करुन त्यांना गौरविण्यात आले. केंद्र शासन व राज्य शासन यांच्या मदतीने अग्निशमन सेवांची तूट टप्प्या-टप्याने भरुन काढण्यात येत आहे. राज्यात अग्निशमन कायदा सन २००८ पासून अंमलात आला असून यामध्ये काळानुरुप काही सुधारणा करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या सुधारणांमध्ये प्रामुख्याने शैक्षणिक इमारती, तसेच गोदामे आणि शीतगृहांच्या इमारतींची उंची वाढविणे, अग्निशमन व जीवसंरक्षक लेखा परीक्षकाची तरतूद करण्यात आलेली आहे, यासारख्या सुधारणा अग्निशमन कायदयात करण्यात येणार आहेत.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न राज्यस्तरीय पुरस्कार राक्षे यांना प्रधान



पंढरपूर/प्रतिनिधीः डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त संस्था विश्र्वभूषण बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्यातर्फे शिवतीर्थ येथे महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त संस्था यांच्या वतीने श्री धनंजय राक्षे यांचा श्री संत तनपुरे महाराज मातोश्री वृद्धाश्रमातील गेले २५ वर्षापासून ज्येष्ठ वृद्धांची निरपक्ष सेवा व आजपर्यंत १३० वृद्धांचा अंतिम विधी सेवा सत्कार्य केल्याबद्दल भारतीय संविधानाची प्रत व सन्मान चिन्ह प्रशस्त पत्र शाल श्रीफळ देऊन माजी समाज कल्याण मंत्री श्री लक्ष्मणरावजी ढोबळे साहेब यांच्या हस्ते गौरविण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा खासदार अमरजी कांबळे उपस्थित होते या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डीरा सरोवर माजी नगरसेवक सवरी कॉलेजचे संस्थापक सचिव प्राचार्य डॉ बीपी रोंगे सर. मनसेचे राज्य नेते दिलीप धोत्रे. शेतकरी संघटनेचे श्री भैय्या प्रभाकर देशमुख भाजपचे नितीन काळे अनिल ननवरे सर वंदना कसबे सोहम जयस्वाल देव माने जगदाने शेखर नागटिळक आधी सर्व क्षेत्रातील कार्यकर्ते व इतर संस्थेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## अक्कलकोट तालुक्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसान भरपाई देण्याची रिपाइंची मागणी



अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील गेल्या काही दिवसापासून पडलेल्या अवकाळी पाऊस व वादळी वार्यामुळे शेतकर्यांच्या अतोनात नुकसान झाली असून संबंधीत अधिकार्यांना सखोल चौकशी करून त्यांना मुबलक नुकसान भरपाई देण्यात यावे. अशी मागणी रिपाइ(अठवले गट) अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे. तालुक्यात काही दिवसा पासून झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वार्याने शेतकर्यांचे द्राक्ष,अंबे दाळींब,पाई सह ईतर पिकांचे अतोनात नुकसान झालेली आहे.आणि विजेचे खांबेही पडली असून वारंवार विज बंद होत असल्याने अनेक नागरीक व शेतकर्यांचे गैरसोय होत आहे. त्यामुळे विज मंडळाचे अधिकार्यांना जातीने लक्ष घालून होणार्या गैरसोय दुर करण्यात यावे. व तरी झालेल्या नुकसानीचे शासनाकडून संपूर्ण सर्वे करुन नुकसान भरपाई देण्यात यावे.व होणार्या गैरसोय दूर करण्यात यावे अशी मागणीही रिपाइं कडून केली आहे. यानिवेदनांवर रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे, शहर अध्यक्ष अजय मुकणार,ता सचिव राजु भगळे,कोषाध्यक्ष अंबादास गायकवाड यांच्या सह्या आहे.

# गोगांवचे सरपंच वनिता सुरवसे यांना तेजस्विनी महाराष्ट्राची राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत




**गोगांव गावाच्या विकासासाठी सरपंच पदाची सूत्र हातात घेतल्यापासून कोट्यवधी निधी गावाला आणले आहे गावाची पाण्याची टंचाई कायम स्वरुपी मिटावे यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत एक कोटी पंचवीस लाख रुपये निधी आणले असून कलेश्र्वर देवस्थान परिसर विकास करण्यासाठी तीर्थ शेत्र विकास निधी स्थानिक आमदार विकास निधी, खाजदार यांच्या मार्फत निधी, आमदार कपिल पाटील यांच्या मार्फत निधी असे निधी खेचून आणून गावाच्या विकासासाठी सतत प्रयत्न शिल असतात त्यामुळे सरपंचांना मिळाले पुरस्कार पुन्हा त्यांना काम करण्यासाठी ऊर्जा मिळेल**

सोलापूर/प्रतिनीधी : एस एस सिनेव्हिजन व आझाद फाऊंडेशन यांच्या माध्यमातून मागील सहा वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात, कला, क्रीडा, प्रशासकीय, सामाजिक, राजकिय, उद्योग, शिक्षण, आरोग्य, संस्कृतीक या क्षेत्रात उल्लेखनीय करणाऱ्या प्रतिभावंत महिलांचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात येत आहे.जेणे करून त्यांचा उत्साह वाढवा आणि इतरांना देखील त्यांच्या कर्तबगारीची प्रेरणा मिळावी या हेतूने दर वर्षी हा पुरस्कार सोहळा सिकंदर सय्यद आणि आदम सय्यद यांच्या संकलपनेतून आयोजीत केला जात आहे.यंदा तेजस्विनी महाराष्ट्राची या पुरस्काराने संपूर्ण महाराष्ट्रातील प्रतिभावंत महिलांचा सन्मान मोठया दिमाखदार आणि सिनेसृष्टी, प्रशासकीय सेवेतील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यामध्ये सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या सोलापूरच्या जिल्हा समन्वयक तथा अक्कलकोट तालुक्यातील गोगाव गावच्या सरपंच सौ वनिता मधुकर सुरवसे यांना उत्कृष्ट सरपंच म्हणून तेजस्विनी महाराष्ट्राची हा राज्यस्तरीय पुरस्कार पुण्यामध्ये देण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन एस एस सिनेव्हिजनचे डायरेक्टर सिकंदर सय्यद व आझाद फाऊंडेशनचे अध्यक्ष आदम सय्यद यांनी केले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कल्पना कपीले, महाराष्ट्र पोलीस उपसंचालक (पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई)

ए सी पी संजय पाटील, अनेक सुपरहिट चित्रपट आणि टीव्ही सिरीयल चे दिग्दर्शक अर्शद खान, क्रिएटिव्ह व रियालिटी शोज चे दिग्दर्शक सलीम शेख, प्रसिध्द संगीत दिग्दर्शक हुमायू कबीर, सारेगम फेम गायिका निरुपमा डे, अभिनेत्री सिद्धी कामत, भारत सरकारच्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय धावपटू इब्राहिम अरेभावी, रोजगानिर्मिती क्षेत्रात आघाडीवर असलेल्या टॅलेंट कॉर्प सोल्यूशन चे संचालक डॉ. महेबुब सय्यद या दिग्गज मान्यवरांच्या उपस्थित सरपंच सौ वनिता मधुकर सुरवसे यांना त्यांच्या कामगिरी बद्दल तेजस्विनी महाराष्ट्राची पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

# अजूनही मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी

मुंबई : निवडणूक काळात प्रत्येक टप्प्यावर नामांकनाच्या अखेरच्या दिवसाच्या साधारण १० दिवस आधीपर्यंत मतदार नोंदणीसाठी आलेले अर्ज हे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याच्या दृष्टीने विचारात घेतले जातात. या अर्जांची आणि पुरावा म्हणून जोडलेल्या दस्तऐवजांची पडताळणी करण्यासाठी व हरकती मागवण्यासाठी हा साधारण १० दिवसांचा कालावधी गृहीत धरला गेला आहे.राज्यात पाचव्या टप्प्यात दि. २० मे रोजी धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-पश्र्चिम, मुंबई उत्तर-पूर्व, मुंबई उत्तर- मध्य, मुंबई दक्षिण- मध्य आणि मुंबई दक्षिण या १३ मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. या मतदारसंघांसाठी नामनिर्देशन सादर करण्याची अखेरची तारीख ३ मे २०२४ आहे.

त्यानुसार, या लोकसभा मतदार संघातील ज्या पात्र नागरिकांनी दि. १ एप्रिल २०२४ रोजीपर्यंत आपल्या वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असतील व त्यांचे नाव अद्याप मतदार यादीत समाविष्ट झालेले नसेल, अशा नागरिकांनी या मतदारसंघामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी दि. २२ एप्रिल २०२४ पर्यंत अर्ज केल्यास (ऑफलाइन तसेच ऑनलाइन पद्धतीने) त्यांची नावे मतदार यादीत (अन्यथा पात्र असल्यास) समाविष्ट होऊ शकतील. यामुळे सर्व पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, हे तपासून, जर नाव नसल्यास त्वरीत दि. २२ एप्रिल २०२४ पर्यंत मतदार नोंदणीचा अर्ज क्र. ६ भरावा, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून करण्यात आले आहे.

**✽ मतदार यादीत नाव कसे तपासावे**

voters.eci.gov.in हे संकेतस्थळ किंवा Voter Helpline ॲपचा वापर करून मतदार यादीत आपले नाव शोधा

वैयक्तिक तपशिलाच्या पर्यायांतर्गत नाव, आडनाव, वडील किंवा पतीचं नाव, वय, लिंग, राज्य, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ या तपशिलाच्या आधारे किंवा मतदार ओळखपत्र क्रमांकाच्या आधारे किंवा मोबाइल क्रमांकाच्या आधारे ( तो जर तुमच्या मतदार ओळखपत्राशी जोडला असेल तर) किंवा Voter Helpline App da मतदार ओळखपत्रावरील क्यू आर कोड स्कॅन करूनही मतदार यादीत आपले नाव शोधता येते.

**✽ मतदार नोंदणीचा अर्ज कसा भरावा**

अर्ज क्र. ६ - नवमतदार नोंदणी

ऑनलाइन पद्धतीने - voters.eci.gov.in हे संकेतस्थळ किंवा Voter Helpline App चा वापर करून मतदार नोंदणीचा अर्ज भरा

ऑफलाइन पद्धतीने- आपले छायाचित्र, तसेच वय आणि सर्वसाधारण निवासाच्या स्वतःची स्वाक्षरी असलेल्या पुराव्यासह आपल्या जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयाला भेट द्या. अधिक तपशिलांसाठी लिंक: https://ceoelection.maharashtra.gov.in/SearchInfo/VHCs.aspx मतदार नोंदणीच्या अर्जासोबतच वयाचा पुरावा म्हणून जन्माचा दाखल, भारतीय पासपोर्ट, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड, दहावी किंवा बारावीचे निकालपत्र या दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज जोडता येईल.

मतदार नोंदणीच्या अर्जासोबतच सर्वसाधारण निवासाचा पुरावा म्हणून भारतीय पासपोर्ट, आधारकार्ड, राष्ट्रीय, श्येड्युल्ड बँक किंवा टपाल विभागाचे खात्याचे चालू पासबूक, पाणी, वीज तसेच स्वयंपाकाच्या गॅस जोडणीचे किमान एका वर्षाच्या आतील देयक, नोंदणीकृत भाडे करार, नोंदणीकृत विक्री करार या दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज जोडता येईल.

voters.eci.gov.in हे संकेतस्थळ तसेच Voter Helpline या ॲपवरून मतदार नोंदणीचा अर्ज क्र. ६ कसा भरावा, मतदार यादीत नाव कसे तपासायचे याचे मार्गदर्शनपर व्हिडिओ मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या उएज चरहरीहींर या युट्यूब वाहिनीवर उपलब्ध आहेत.

# 'महिला मतदार, मतदान करणार' महिलांनो, करा निर्धार मतदानाचा : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




छत्रपती संभाजीनगर : बचतगटांद्वारे संघटीत महिलांनी महिला मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व सांगावे. त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रेरित करावे. आणि 'महिला मतदार, मतदान करणार' या घोषवाक्यानुसार जिल्ह्यातील सर्व महिला मतदारांनी आपण मतदान करणारच असा निर्धार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

वंदे मातरम सभागृहात आज महिला बचत गटांचा मतदार जनजागृतीबाबत मेळावा पार पडला. स्वीप नोडल अधिकारी सुदर्शन तुपे, मनपा उपायुक्त पांढरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक अशोक शिरसे, स्वप्निल सरदार, माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास तसेच तालुका समन्वयक, महिला बचत गट सदस्य, बचत गटाच्या प्रमुख यांची मेळाव्यास उपस्थिती होती.जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महिला बचत गटाच्या महिलांचा संपर्क गावातील अन्य महिलांशी असतो. त्यामुळे त्यांनी आपापल्या गावात आर्थिक सक्षमीकरणासोबतच लोकशाहीला सुदृढ करण्यासाठी योगदान द्यावे. प्रत्येकाने मतदान केले पाहिजे, हे त्यांना सांगावे. महिलांनी स्वतः मतदान करण्याबरोबरच इतरांनाही मतदान करण्याचा संदेश द्यावा. आपण नागरिक म्हणून ज्या सेवा सुविधा, हक्क अधिकार प्राप्त करतो त्यासोबतच मतदान करण्याचे कर्तव्यही आपण पुर्ण केले पाहिजे. योग्य उमेदवार निवडणूक यावा यासाठी मतदानाचे प्रमाण वाढणे महत्त्वाचे आहे. भावी पिढी संस्कारक्षम घडावी यासाठी महिला आपल्या मुलांवर संस्कार करतात. त्याचप्रमाणे भावी पिढीला समृद्ध, सुदृढ लोकशाही मिळावी यासाठी महिलांनी मतदान करायला हवे. 'महिला मतदार मतदान करणार', या घोषवाक्यानुसार स्वतःसह इतर महिलांनाही मतदानाचे महत्त्व सांगून मतदान करण्यास प्रवृत्त करावे, असे जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले.महिलांच्या मतदानाची टक्केवारी वाढवण्यात आपला सहभाग असावा असा निर्धार महिलांनी येथे करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ग्रामीण भागातील महिलांच्या सहभागामुळे जिल्ह्यात महिलाच्या मतदानाचे प्रमाण वाढेल, जिल्ह्याच्या मतदानाचा टक्का पाहिजे.

महिला बचत गटांच्या या मेळाव्यात कीर्तन, पथनाट्य व विविध उपक्रमातून मतदान जागृती चे कार्यक्रम सादर करण्यात आले. प्रास्ताविक अशोक शिरसे यांनी केले. स्वीपचे नोडल अधिकारी सुदर्शन तुपे यांनीही मनोगत व्यक्त केले तर आभार प्रदर्शन प्रकल्प समनव्यक सुचिता खोतकर यांनी केले.

# श्रीकाशीपीठाच्या परीक्षांचे पारितोषिक वितरण संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः आपल्या वीरशैव धर्माचे आचरण पाळणे फार महत्त्वाचे आहे. यामध्ये भस्म (विभूती) लावण्यापासून ते अनेक धार्मिक विधी पर्यंत सर्वांनी आपल्या वीरशैव धर्माचे पालन करणे आवश्यक आहे.

वीरशैव सिद्धांत परीक्षेस बऱ्याच ठिकाणी कुटुंबातील माता-पिताच बसतात तर यापुढे कुटुंबातील लहान मुलांना, युवकांना आपल्या वीरशैव धर्माची माहिती, धर्माचा सिद्धांत, धर्माचे आचरण, पालन करण्यासाठी परीक्षेला बसवावे असे श्रीकाशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जून विश्र्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी प्रतिपादन केले.

श्रीकाशी जगद्गुरू विश्र्वाराध्य वीरशैव विद्यापीठ जंगमवाडीमठ, वाराणसी आयोजित वीरशैव सिद्धांत परीक्षा राज्यस्तरीय पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ष. ब्र. श्री श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी (नागणसूर), डॉ. शरणबसप्पा दामा व डॉ. महादेवी दामा, गुड्डापूर श्री धानम्मादेवी ट्रस्ट अध्यक्ष सिद्धय्या स्वामी-हिरेमठ, संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी, बाबुराव मैंदर्गीकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. दामा म्हणाले की, श्रीकाशीपीठातून अनेक धार्मिक, शैक्षणिक उपक्रम चालतात. तेंव्हा सर्व सद्भक्तांनी याची जाण ठेवून आपले जीवन व्यतित केले पाहिजे, सर्वांनी कायमस्वरूपी शरीरावर लिंग धारण केले पाहिजे आणि ते सक्तीचं झालं पाहिजे.

यावेळी वीरशैव सिध्दांत प्रबोध परीक्षेतीलप्रथम - डॉ.सुरेखा जतकर (बुलढाणा), द्वितीय- अनुपमा सदावर्ते (नागपूर), तृतीय - मंजुषा बटवे (अकोला), वीरशैव सिध्दांत प्रवीण परीक्षेतील प्रथम - उज्वला मोतेवार (नागपूर), द्वितीय - शिवगंगा खुबा (सोलापूर)तृतीय - राजेश्र्वर चेडगुलवार (नांदेड) यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

तसेच नूतन केंद्र संचालक शि.भ.प. सरस्वती स्वामी (आंबेजोगाई), मन्मथ स्वामी वालवडकर बीड, संतोष कुमार स्वामी (अक्कलकोट), सिद्धाराम कुंभार (टाकळी जुना), बमनिंगय्या हिरेमठ (हत्तुर), उमाशंकर मिटकरी (भूम/वाशी), अमृता बचाटे तुळजापूर, मीनाक्षी माशाळकर उमरगा,ज्योती फिस्के (बुलढाणा), वीणा चेडगे (छिंदवाडा), भाग्येश दिवटे (टाकळी), संतोष खुडे (बार्शी) यांचा जगद्गुरूंच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास परीक्षा विभागप्रमुख राजेंद्र बलसुरे, डॉ.अनंत बिडवे, सहाय्यक गुरुशांत रामपूरे, विद्यानंद स्वामी, चिदानंद मुस्तारे, सचिन विभुते, संदीप स्वामी, म्हेत्रे यांच्यासह संबंधित सर्व केंद्र संचालकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास नागपूर, अकोला, बुलढाणा, नांदेड, सोलापूर, तुळजापूर येथील पारितोषिकाचे मानकरी तसेच उत्तीर्ण असंख्य परीक्षार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र बलसुरे यांनी केले. उपस्थितांचे स्वागत विद्यानंद स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन रेवणसिद्ध वाडकर यांनी केले. आभार गुरूशांत रामपूरे यांनी मानले.

शेवटी सर्व उपस्थितांना बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. यापुढेही सर्व केंद्र संचालकांनी वीरशैव सिध्दांत परीक्षेस जास्तीत जास्त सद्भक्तांना बसवावे असे आवाहन परीक्षा विभागप्रमुख राजेंद्र बलसुरे यांनी केले.

# मतदार साहाय्यता क्रमांकावरून मतदारांच्या शंकांचे निरसन

मुंबई : भारत निवडणूक आयोगाच्या १८००२२१९५० मतदार साहाय्यता क्रमांकावर दिनांक १८ एप्रिल २०२४ पर्यंत ७३१२ इतके फोन आलेले आहेत. सर्व फोन कॉल्सना व्यवस्थित उत्तरे देण्यात आली असून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे, अशी माहिती अवर सचिव तथा उपमुख्य निवडणूक अधिकारी शरद दळवी यांनी दिली आहे.यामध्ये सर्वसामान्य माहिती, अर्जाची स्थितिगती, मतदार ओळखपत्र प्राप्त न होणे, नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीत नाव तपासणे, स्थलांतर केल्यानंतर पत्त्यातील बदल, विविध दुरुस्त्या, नाव वगळणी, मतदार ओळखपत्र आधारकार्डाशी जोडणे, मतदार ओळखपत्र हरवणे, मतदार ओळखपत्राशी मोबाइल क्रमांक जोडणे, इत्यादी विषयांच्या अनुषंगाने माहिती विचारणारे फोन आलेले आहेत. आलेल्या फोनमध्ये सर्वसामान्य माहिती विचारणारे फोन सर्वाधिक होते. असे १३३२ फोन आले. सर्वसामान्य माहितीमध्ये मतदारसंघाचा संपर्क क्रमांक व पत्ता, ऑनलाईन अर्जाबाबत माहिती विचारली गेली. त्या खालोखाल अर्जाची स्थितिगती जाणून घेण्यासाठी ५०७, मतदार यादीत नाव तपासण्यासाठी ५०३, मतदार ओळखपत्र प्राप्त न झाल्याबद्दल ४७०, नवमतदार नोंदणीसाठी ४५४ फोन आले. उर्वरित फोन संकीर्ण माहितीसाठी विचारण्यात आले.

महाराष्ट्रातील मुंबई उपनगर या जिल्ह्यातून सर्वाधिक फोन आले, त्यांची संख्या १५७५ इतकी होती. ठाणे जिल्ह्यातून ९९१, मुंबई शहरातून ५२०, रायगडमधून १८२ आणि पुण्यातून १६३ फोन आले.१८००२२१९५० या मतदार साहाय्यता क्रमांकाशिवाय महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत ०२२ - २२०२१९८७ आणि ०२२ - २२०२६४४२ हे दोन अतिरिक्त क्रमांकही मतदारांना त्यांच्या मनातील शंका व प्रश्र्न विचारण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मतदारांना माहिती देण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी २४ तास मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे आणि समाधानकारक उत्तरे देण्यात येत आहेत, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# गडचिरोलीत १११ वर्षाच्या फुलमती यांचे मतदान



गडचिरोली : १२-गडचिरोली-चिमूर मतदारसंघात १११ वर्षाच्या फुलमती बिनोद सरकार या वृद्ध महिलेने गृह मतदानाची सुविधा नाकारत प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन आपले मतदान नोंदविले. फुलमती बिनोद सरकार या मुलचेरा तालुक्यातील गोविंदपूर येथील रहिवासी आहेत. त्यांचा जन्म १ जानेवारी १९१३ रोजीचा आहे. नातवाच्या दुचाकीवर बसून त्यांनी मतदान केंद्रावर जाऊन स्वतः मतदान करत मतदारांमध्ये उत्साह निर्माण केला. लोकशाहीच्या उत्सवात सर्वजण सहभागी होत मतदानासाठी बाहेर निघत होते. यातच तरुण मतदारांनाही लाजवणारा उत्साह दाखवत, या १११ वर्षांच्या आजींनी मतदान केंद्रावर जाऊन प्रत्यक्ष मतदान केले. वयोवृद्ध फुलमती सरकार यांनी स्वतः मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्यासाठी घेतलेला पुढाकार इतर मतदारांपुढे एक आदर्शवत असल्याची प्रतिक्रिया जिल्हाधिकारी संजय दैने यांनी दिली आहे. तर अहेरी विधानसभा मतदार संघाचे सहायक निवडणूक अधिकारी आदित्य जीवने यांनी फुलमती आजीचे अभिनंदन करत मतदान प्रक्रियेत नोंदवलेल्या सहभागाबद्दल त्यांना धन्यवाद दिले आहे.